मराठी सत्ता



# मुंबईत "नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार" सोहळा उत्साहात संपन्न!



अपर जिल्हाधिकारी सुचिता भिकाने


सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार


केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत


कालीपुत्र कालीचरण महाराज



सिद्धार्थ जाधव


भाऊ कदम


आयएएस अजित कुंभार


मकरंद देशपांडे



सई ताम्हनकर



भूमिका तिवारी



पियुष पनवर



शरद गुजर


कुमार सानू


आयएएस सुहास दिवसे



परमेश्वर कदम

**"नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार" सोहळा दि. दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी यशवंत नाट्यगृहात मोठ्या दिमाखात पार पडला. हे या सोहळ्याचे २५ वे वर्ष होते.**

"नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार" सोहळा दि. २८ नोव्हेंबर रोजी यशवंत नाट्यगृहात मोठ्या दिमाखात पार पडला. हे या सोहळ्याचे २५ वे वर्ष होते. यंदा हा पुरस्कार सोहळा फार विशेष असा होता. अनेक मान्यवरांनी या सोहळ्याला हजेरी लावली होती. केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री गजेंद्र सिंह शेखावत आणि राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत हा समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमास सिनेसृष्टीतून मकरंद देशपांडे, मुरली शर्मा, सई ताम्हणकर, भाऊ कदम, सिद्धार्थ जाधव यांच्यासह प्रसिद्ध गायक कुमार सानू यांनीही हजेरी लावली होती. या सोहळ्याच्या माध्यमातून केंद्रिय सांस्कृतिक कार्यमंत्री गजेंद्र सिंह शेखावत व राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्यांना नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यात गायन विभागात पुरस्काराचे मानकरी ठरले कुमार सानू व पियुष पनवर तर अभिनय क्षेत्रात मकरंद देशपांडे, मुरली शर्मा, सई ताम्हणकर, भालचंद्र उर्फ भाऊ कदम, सिद्धार्थ जाधव यांना हा पुरस्कार देण्यात आला.

तर सेवा रत्न पुरस्कार मा. सुहास दिवसे (IAS), जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राप्त झाला. मा. अजित कुंभार (संयुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी MIDC) यांनाही पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं. मा. सुचिता भिकाने (अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक महापारेषण)) यांनाही हा पुरस्कार प्राप्त झाला.

तसेच आध्यात्म, सामाजिक व राजकीय विभागात मा. काली पुत्र कालीचरण महाराज (हिंदू प्रसारक, आध्यत्मिक गुरू) यांना संत शिरोमणी पुरस्कार व माजी नगरसेवक परमेश्वर कदम यांना समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी केंद्रिय सांस्कृतिक कार्यमंत्री गजेंद्र सिंह शेखावत म्हणाले की, प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती ही समाजाला काहीतरी देणं आहे. आज या सोहळ्यात एवढी दिग्गज मंडळी आली आहेत, ते फक्त एका शेतक-याच्या त्या मुलाची जिद्द पाहून. एवढच नव्हे तर गजेंद्र सिंह या सोहळ्यात आशिष शेलार यांना म्हणाले, आता ही वेळ आहे की, दत्तात्रेय माने यांना देखिल एखादा पुरस्कार देऊन सन्मानित करायला हवे. प्रत्येक पुरस्कार सोहळ्याचे एक वेगळे महत्व असते. काही खूप ग्लॅमरस असतात, तर काहीमध्ये फक्त कलाकारांची चर्चा असते. मात्र माने यांनी आयोजित केलेला हा पुरस्कार सोहळा मने जोडणार आहे.

यावेळी दत्तात्रय माने यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं. ते म्हणाले,"लढ म्हणून जी थाप आशिष शेलार यांनी मारली ती आयुष्यात मला नक्कीच पुढे घेऊन जाणार आहे." या पुरस्काराच्या वेळी जेव्हा मी मकरंद देशपांडे यांच्या घरी गेलो, तेव्हा त्यांनी मला खूप प्रेरणा दिली आणि माझी थोडी शाळाही घेतली. पण त्यांनी माझं मन बघितलं आणि या पुरस्कारासाठी साथ दिली. पुढे ते म्हणाले, शेखावत साहेब आणि शेलार साहेब यांना माझी एवढीच विनंती आहे की, बालगंर्धव यांनी आपलं संपूर्ण आयुष्य मुंबईला दिलयं, त्यामुळे महाराष्ट्र शासनाने बालगर्धंव यांचे मोठ स्मारक मुंबईतील परळ येथे उभरावं. ज्यामुळे इथल्या कलाप्रेमींना संधी मिळेल आणि आपली मराठी सिनेसृष्टी मोठी होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

माने पुढे म्हणाले, गेली अनेक वर्ष हा पुरस्कार सोहळा संपूर्ण महाराष्ट्रभर केला. मात्र यंदा पहिल्यांदाच हा सोहळा मुंबईत पार पडला. या सोहळ्या दरम्यान दत्तात्रय माने यांनी कुसुमाग्रज यांची कविताही ऐकवली.

**ओळखलत का सर मला?**

पावसात आला कोणी, कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी.

क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून.

गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहुन.

माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली,

मोकळ्या हाती जाईल कशी, बायको मात्र वाचली.

भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते नेले, प्रसाद म्हणून पापण्यांवरती पाणी थोडे ठेवले.

कारभारणीला घेऊन संगे सर आता लढतो आहे.

पडकी भिंत बांधतो आहे, चिखलगाळ काढतो आहे,

खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला पैसे नकोत सर, जरा एकटेपणा वाटला.

मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेऊन,फक्त लढ म्हणा! गंगामाई

या सोहळ्या दरम्यान अभिनेता मकरंद देशपांडे यांनी एक मोठ विधान केलं. ते म्हणजे रंगमंचाशिवाय आपली मराठी सिनेसृष्टी नाही, इतर ठिकाणी एआय काहीही करू शकेल मात्र इथे नाही. मी सगळ्यांना आवर्जुन सांगीन की, बालगंधर्व यांच्या संदर्भात थोडं वाचा.

दरम्यान मकरंद देशपांडे यांनी प्रेक्षकांना कुसुमाग्रज यांची कविताही ऐकवली. जाता जाता गाईन मी, गाता गाता जाईन मी !

गेल्यावर ही या गगनातील, गीतांमधूनी राहीन मी..!!

Printed, Published and Owned by DATTAPRASAD NARAYAN VENGURLEKAR and Printed at MAOOLEE PRINTS & ARTS, Gala No 9/A, Ground Floor, Byculla Service Industrial Estate, D.K.Cross Road, Byculla (E), Mumbai - 400 027 and published at 14-B, Skyline, Patrakar Nagar C.H.S., Maharshi Walmiki Marg, Opp. Bims Paradise High school, Kopri, Thane 400 603. **E-mail :** saptahikmarathisatta@gmail.com

**Editor - Dattaprasad Narayan Vengurlekar (Mob. :9892 68 96 19)** **RNI NO. MAHMAR/2016/67204**